# * घटक: सार्वजनिक वित्त *

* सोप्या भाषेत सार्वजनिक वित्त म्हणजेच सरकारी पैसा.

**सार्वजनिक आय-व्यय** : केंद्र सरकार, राज्य सरकारे, स्थानिक सरकारे तसेच इतर सरकारी संस्था यांचे उत्पन्न म्हणजे आय तर खर्च म्हणजे व्यय.

↓

**व्याप्ती**

i) **सार्वजनिक उत्पन्न** : सरकारची कर आकारणी, करेतर उत्पन्न, सार्वजनिक उत्पन्न तूटीचा अर्थभरणा इ. उत्पन्नाचा अभ्यास.

ii) **सार्वजनिक खर्च** : सरकारी खर्चाची तत्त्वे, खर्चाचे वर्गीकरण, राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, किंमत पातळी इ. समावेश.

iii) **सार्वजनिक कर्ज** : कर्ज उभारणीची कारणे, पद्धती, कर्जाचे व्यवस्थापन, कर्ज परतफेड पद्धती इ.चा अभ्यास.

iv) **वित्तीय व्यवस्थापन** : अर्थसंकल्पाचे प्रकार, पैशाचा विनियोग याची तपासणी इ. बाबी.

v) **राजकोषीय धोरण / राजवित्तीय धोरण** : शासनाच्या जमा खर्चाच्या धोरणाला राजकोषीय/राजवित्तीय धोरण म्हणतात. हे धोरण अर्थसंकल्पातून जाहीर होते. RBI च्या विविध धोरणांचाही यात समावेश होतो. राजकोषीय धोरण महत्तम सामाजिक लाभाच्या तत्त्वावर आधारित असते.

⇒ **बाजार व्यवस्थेत सार्वजनिक वित्ताची भूमिका** :

① **नियतन कार्य** ⟹ सार्वजनिक वस्तू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही सेवा व वस्तू (उदा. संरक्षण, रस्ते, प्रशासन इ.) बाजार व्यवस्थेत उपलब्ध होऊ शकत नाहीत. सार्वजनिक वस्तू जनतेला उपलब्ध करून देणे म्हणजे नियतन कार्य होय.

② **वितरण कार्य** ⟹ सरकार कर व खर्च या धोरणाद्वारे उत्पन्नाचे समान व न्याय्य वाटप घडवून आणणे.

③ **स्थैर्य कार्य** ⟹ अर्थव्यवस्थेच्या चढ-उतारात बेरोजगारी व चलनवाढीची परिस्थिती निर्माण होते. सरकार राजकोषीय धोरणाद्वारे त्यावर नियंत्रण आणणे.

## * शासकीय अर्थसंकल्प / अंदाजपत्रक

→ इंग्रजीत बजेट (Budget) हा शब्द ⇒ Bougette या फ्रेंच शब्दापासून अर्थ (चामड्याची पिशवी)

→ या शब्दाचा वापर इंग्लंडमध्ये १७३३ मध्ये

→ आर्थिक वर्षाच्या शासकीय जमा खर्चाच्या कायदेमंडळापुढे विचारार्थ ठेवावयाच्या प्राथमिक स्वरूपातील योजनांचा व शिफारशींचा समावेश ज्या कागदपत्रात केला जातो त्यास बजेट किंवा अर्थसंकल्प म्हणतात.

Scanned by CamScanner

⇒ भारतातील अर्थसंकल्पाची सुरुवात ⇒ स्वातंत्र्यापूर्वी

ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश पार्लमेंटकडे सत्ता गेल्यानंतर (१८५८) दोन वर्षांनी – ७ एप्रिल १८६० – रोजी पहिला अर्थसंकल्प : जेम्स विल्सन.

⇒ स्वातंत्र्यापूर्वीच्या अंतरिम सरकारमध्ये ⇒ लियाकत अली खान – १९४६-४७

⇒ स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले वित्तमंत्री ⇒ षण्मुखम चेट्टी –

## अर्थसंकल्पाची व्याप्ती :

⇒ कोणत्याही अर्थसंकल्पात सरकारी जमाखर्चाची ३ वर्षांची आकडे.

① गतवर्षाच्या वित्तीय वर्षाची प्रत्यक्ष आकडे.

② चालू वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय व संशोधित अंदाज.

③ पुढील वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज.

## अर्थसंकल्पाचे वेळापत्रक :

① २०१७ पासून अर्थसंकल्प १ फेब्रु च्या दिवशी मांडण्यास सुरुवात

② २०१७ पासून रेल्वे व केंद्रीय अर्थसंकल्प एकत्र –॥–

③ त्याअगोदर – २८/२९ फेब्रुवारी – केंद्रीय अर्थसंकल्प
२७/२८ –॥– आर्थिक पाहणी अहवाल
२५/२६ –॥– रेल्वेचा अर्थसंकल्प – (१९२१ च्या ॲकवर्थ समितीच्या शिफारशीनुसार १९२४ पासून रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्र)

## आर्थिक वर्ष / वित्तीय वर्ष

सध्या १ एप्रिल ते ३१ मार्च – १८६७ पासून
त्यापूर्वी १ मे ३० एप्रिल.

मे १९८४ – एल के झा समिती – शिफारस ⇒ १ जाने ते ३१ डिसें करण्याचे परंतु अमान्य.

जुलै २०१६ – शंकर आचार्य समिती – १ जाने ते ३१ डिसें या कालावधीची व्यवहार्यता तपासण्यासाठी.

## अर्थसंकल्पीय प्रक्रिया व घटनात्मक तरतुदी.

अवस्था चार ① अर्थसंकल्प तयार करणे

② त्याला कायदेशीर रूप देणे

③ अंमलबजावणी

④ लेखा व लेखा परिक्षण.

## १) अर्थसंकल्प तयार करणे :

केंद्रसरकारचा अर्थसंकल्प : घटनेचे कलम ११२ } वित्त मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या
राज्य सरकारचा अर्थसंकल्प : कलम २०२ } आर्थिक कामकाज विभागामार्फत तयार.

केंद्राच्या/राज्याच्या अर्थमंत्र्याकडून सादर केला जातो. (राष्ट्रपतींच्या वतीने)
अर्थसंकल्प मांडण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी केंद्रात राष्ट्रपती तर राज्यात राज्यपालांची.

⇒ घटनेत बजेट हा शब्द नसून 'वार्षिक वित्तीय विवरणपत्रक' (Annual financial statement) हा शब्द
⇒ दरवर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेला (१ फेब्रुवारी) → सन २०१७ पासून — वेळ सकाळी ११ वा.
तसेच रेल्वे व केंद्रीय अर्थसंकल्प एकत्र मांडण्यास सन २०१७ पासून सुरुवात.

यापूर्वी. २८/२९ फेब्रु ⟶ केंद्रीय अर्थसंकल्प
२७/२८ फेब्रु ⟶ आर्थिक पाहणी अहवाल
२५/२६ फेब्रु ⟶ रेल्वेचा अर्थसंकल्प.

अर्थमंत्री अर्थसंकल्पिय भाषण देतात : भाग अ ⟶ आर्थिक पाहणी
भाग ब ⟶ करप्रस्ताव.

सर्वप्रथम लोकसभेत नंतर राज्यसभेत.

## २) अर्थसंकल्पाला कायदेशीर रूप देणे :

सरकारचा कर प्रस्ताव व सरकारच्या नियोजीत खर्चासाठी संचित निधीतून पैसे काढण्यासाठी संसदेची संमती मिळविणे म्हणजे अर्थसंकल्पास कायदेशीर रूप देणे. यातील टप्पे.

① साधारण चर्चा ⟹ दोन्ही सभागृहात आठवडाभर केवळ सामान्य चर्चा चालते. त्यानंतर राज्य सभेचे कार्य संपते पुढील सर्व कार्य लोकसभेत चालते.

② अनुदान मागणीवर मतदान ⟹ अनुदानाच्या मागणीवर चर्चा व मतदान होते. नियोजीत खर्चाचे दोन प्रकार : १) कलम ११२ - प्रभारीत खर्च २) कलम ११३ - मतदानित खर्च

i) भारताच्या संचित निधीवर प्रभारित खर्च :
i) घटनेने ग्राह्य मानलेले खर्च
ii) यांच्यावर मतदान घेतले जात नाही.

यामध्ये १) राष्ट्रपती - पगार व भत्ते तसेच कार्यालयाचा सर्व प्रशासकीय खर्च.
२) लोकसभा व राज्यसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष पगार व भत्ते —
३) सर्वोच्च न्याया. न्यायाधिशांचे ——〃—— व कार्यालय खर्च.
४) उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांचे पेंशन
५) महालेखापाल - पगार, भत्ते व पेन्शन
६) संघ लोकसेवा आयोग अध्यक्ष, सदस्य पगार, भत्ते, व पेन्शन.
७) भारत सरकार देय असलेल्या कर्जावरील व्याज.

ii) भारताच्या संचित निधीवरील 'मतदानित खर्च' : यामध्ये प्रत्येक मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागणीच्या खर्चाचा समावेश. यावर लोकसभेत मतदान घेतले जाते.

→ ह खर्च पुढच्या संचित निधीतून करावयाचा असतो.- अनुदानाच्या मागण्या केवळ लो.
मांडल्या जातात तसेच मांडण्यासाठी राष्ट्रपतींची पूर्व परवानगी आवश्यक असते.

पुरक
अतिरिक्त
आधि

② कपात प्रस्ताव:- तीन प्रकार:

① काटकसर कपात ⇒ मागणीतील काही विशिष्ट रक्कम कमी करण्यात यावी ही मागणी.

② धोरणात्मक कपात ⇒ मागणी ज्या धोरणावर आधारीत असेल त्या धोरणाच्या अमान्यतेविषयी.
मागणी रक्कम एक रुपयापर्यंत कमी करण्यात यावी.

③ प्रतिकात्मक कपात ⇒ जनतेचा एखादा प्रश्न ज्यासाठी भारत सरकार जबाबदार आहे लोकसभेसमोर व पर्यायाने देशासमोर आणण्यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो अनुदानाच्या मागणीच्या रकमेतून १००रु कमी करण्यात यावे.

③ विनियोजन विधेयक: (अनुदानाच्या मागण्या लोकसभेत संमत होणे म्हणजे ठराविक मंत्रालयांना ठराविक रक्कम संमत होणे. मात्र त्यांना ही रक्कम भारताच्या संचित निधीतून प्राप्त करण्याचा अधिकार मिळण्यासाठी लोकसभेत हे विधेयक कलम ११४ नुसार मांडले जाते.

④ वार्षिक वित्तिय विधेयक: यामध्ये सरकारचे सर्व वित्तिय प्रस्ताव असतात. हे विधेयक अर्थसंकल्प मांडतानाच संसदेत मांडले जाते मात्र ते विनियोजन विधेयक पारित झाल्यानंतरच विचारात घेतले जाते. हे विधेयक धन विधेयक आहे. अर्थसंकल्प मांडल्यापासून ७५ दिवसांच्या आत संसदेने संमत करून राष्ट्रपतींची संमती मिळणे आवश्यक असते.

★ इतर काही विशेष अनुदानाच्या मागण्या ★
अर्थसंकल्पातील नेहमीच्या जमाखर्चाव्यतिरिक्त काही असामान्य किंवा विशेष परिस्थितीमध्ये इतर प्रकारच्या अनुदानाची गरज निर्माण होते.

① लेखानुदान: संसदेने अर्थसंकल्प पारित केल्याशिवाय त्याची अंमलबजावणी होवू शकत नाही आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने त्यामुळे तोपर्यंत सरकारी प्रशासकीय कामकाज चालविणे शक्य होण्यासाठी आवश्यक तेवढी रक्कम सरकारला प्राप्त होणे गरजेचे होते. त्यासाठी सरकार काही कालावधी साठी (१२ महिन्यापेक्षा कमी) विविध बाबीवर करावयाच्या खर्चासाठी आवश्यक रकमेची मागणी संसदेकडे करू शकते.

→ लेखानुदान अंदाजपत्रकाबरोबरच सादर केले जाते.

→ साधारण ते दोन महिन्यांसाठी किंवा अंदाजित वार्षिक खर्चाच्या १/६ इतके असते.

→ साधारण चर्चेनंतर पारित होते.

→ सार्वत्रिक निवडणूकीच्या वर्षात लेखानुदान ३ ते ४ महिन्यांसाठी मांडले जाते त्यास अंतरिम अर्थसंकल्प म्हणतात.

Scanned by CamScanner

**पुरक अनुदान** : खर्चाची रक्कम त्या वर्षासाठी अपुरी पडल्यास.

**अतिरिक्त अनुदान** : त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात विचारात न घेण्यात आलेली एखादी खर्चाची बाब नंतर उद्भवते.

**आधिक्य अनुदान** : एखाद्या बाबतीत खर्च संसदेने संमत केलेल्या खर्चापेक्षा अधिक होऊन जातो. मात्र ही अधिक्य अनुदानाची मागणी लोकसभा पुढील आर्थिक वर्षात पारित करते मात्र त्यासाठी लोकलेखा समितीची शिफारस आवश्यक.

**पत अनुदान/प्रत्यय अनुदान** : वित्तीय संसाधनावर अनपेक्षितपणे निर्माण होणारी मागणी भागविता यावी यासाठी पत अनुदानाची मागणी लोकसभेकडून केली जाते. म्हणूनच लोकसभेने कार्यकारी मंडळाला दिलेला हा एक ब्लँक चेक आहे असे म्हटले जाते.

**अपवादात्मक अनुदान** : एखाद्या विशिष्ट उद्दिष्टासाठी संमत केले जाते.
कोणत्याही वित्तीय वर्षाच्या चालू खर्चाशी संबंधित नसतो.

**[illegible]तिक अनुदान** : एका बाबीवरील खर्च दुसऱ्या बाबीकडे वळविण्यासाठी - पुनर्विनियोजनाद्वारे नवीन खर्च अंतर्भूत नसतो.

## * केंद्र सरकारचे निधी *

केंद्र व राज्य सरकार यांना खालील तीन निधी निर्माण करावे लागतात.

① भारताचा/राज्यांचा संचित व एकत्रित निधी. (कलम ⇒ 266 (1))

पुढील मिळकत -
i) कर उत्पन्न.
ii) सरकारने घेतलेली सर्व कर्जे.
iii) सरकारने दिलेल्या कर्जांची आलेली परतफेड
iv) सार्वजनिक उद्योगांचा नफा.

या निधीतून मिळणारा पैसा लोकसभेच्या/विधानसभेच्या संमती शिवाय प्राप्त करता येणार

② भारताचे/राज्याचे सार्वजनिक लेखे यांना लोक लेखे असेही म्हणतात.
कलम ⇒ (266 (2))

वरील पैशाव्यतिरिक्त मिळालेला पैसा उदा. पेन्शन निधी, प्रॉव्हिडंट निधीचा पैसा, जनतेच्या अल्प बचती इ.
हे पैसे सरकार वापरीत असते — मात्र ते सरकारच्या मालकीचे नसतात.
हे पैसे काढण्यासाठी संसदेची मान्यता घेण्याची आवश्यकता नसते.

③ भारताचा/राज्याचा आकस्मिक खर्च निधी.
कलम = 267

अकस्मिकरित्या उद्भवलेला खर्च भागविण्यासाठी हा निधी — कायद्याने ठरविलेली विशिष्ट रक्कम. संचित निधीतून अकस्मिक निधीत ठेवण्यात येते. खर्च करतेवेळी संसदेची संमती घ्यावी लागत नाही त्यानंतरच्या पहिल्या अधिवेशनात संमती घ्यावी लागते. निधी राष्ट्रपती/राज्यपाल यांच्या ताब्यात.

Scanned by CamScanner

अर्थसंकल्प - रचना

⇒ ① महसुली अर्थसंकल्प ② भांडवली अर्थसंकल्प :

## ① महसुली अर्थसंकल्प :

**महसुली जमा :** कर उत्पन्न. 1) उत्पनावरील कर
2) संपत्ती व भांडवली व्यवहारावरील कर.
3) वस्तू व सेवावरील कर.

करेतर उत्पन्न : 1) राजकोषिय नफा : चलनी नोटा व नाण्यांमधून मिळणारा नफा.
2) व्याज उत्पन्न i) घ. राज्ये व कें. प्रदेशांना दिलेल्या कर्जावरील व्याज.
ii) रेल्वे व पोष्ट सेवांवरील व्याज.
iii) सार्व उद्योगांना दिलेल्या कर्जावरील व्याज.
3) नफा व लाभांश : RBI, सार्व बँका, LIC, सार्व उद्योग इ. चा नफा.

**महसुली खर्च :**
a) महसुली योजना खर्च : सामाजिक मालमत्तेच्या देखभालीवरील खर्च.
b) महसुली गैरयोजना खर्च : i) घेतलेल्या कर्जावरील व्याज
ii) संरक्षणाचा महसुली खर्च
iii) अनुदाने
iv) नागरी प्रशासन खर्च, पगार, कार्यालयीन खर्च.

## ② भांडवली अर्थसंकल्प

**भांडवली जमा :** a) निव्वळ कर्ज उभारणी : i) बाजार कर्जे - जनता व व्यापारी बँकाकडून.
ii) कोषागार हुंड्या विकून
iii) बाह्य कर्जे.
b) इतर देणी. i) सरकारकडे जमा असलेल्या जनतेच्या लघुबचती उदा. पोस्ट, नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट, पी.एफ. इ.
c) कर्ज पुनर्प्राप्ती - सरकारने दिलेल्या कर्ज परतफेडीच्या रकमा.
d) इतर - सरकारी उपक्रमाचे भाग विकून - निर्गुंतवणूकीतून.

**भांडवली खर्च :** ⇒ केंद्रिय योजनेवरील खर्च : 1) (उदा. कृषी, ग्रामीण विकास, जलसिंचन, ऊर्जा, उद्योग)
2) राज्ये व कें. प्रदेशांना केंद्राने दिलेली मदत.

⇒ गैरयोजना खर्च : ① संरक्षणाचा भांडवली खर्च
② राज्ये, कें. प्रदेशांना व सार्व उद्योगांना दिलेली कर्जे.
③ घेतलेल्या कर्जांची परतफेड.

Scanned by CamScanner

# अर्थसंकल्पाचे प्रकार

एकूण उत्पन्न ⟹ महसुली जमा + भांडवली जमा.
एकूण खर्च ⟹ महसुली खर्च + भांडवली खर्च.

1) समतोल अर्थसंकल्प : अंदाजित उत्पन्न व अंदाजित खर्च समान.
2) शिल्लकीचा अर्थसंकल्प : अंदाजित उत्पन्न अंदाजित खर्चापेक्षा जास्त
3) तुटीचा अर्थसंकल्प : अंदाजित उत्पन्नापेक्षा अंदाजित खर्च जास्त.

तुटीच्या अर्थसंकल्पामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. गुंतवणूकीसाठी मोठा खर्च दाखवून तूट निर्माण केली जाते. ही गुंतवणूक प्राधान्य क्षेत्रात केली जाते त्यामुळे पैशाची मागणी वाढते, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न वाढते, वस्तूंची मागणी पर्यायाने किंमती वाढतात. त्यामुळे उत्पादन वाढीस चालना मिळते.

## तुटीच्या संकल्पना :

- ① महसुली तूट = महसुली उत्पन्न − महसुली खर्च
② अर्थसंकल्पीय तूट = एकूण उत्पन्न − एकूण खर्च

परंतु सध्या वित्त मंत्रालयाद्वारे एकूण उत्पन्न व एकूण खर्च सारखेच दाखवले जातात कारण उत्पन्न व खर्चातील फरकाची रक्कम विविध साधनांच्या मार्फत जुळवली जाते.

③ राजकोषीय तूट / ~~वित्तीय तूट~~ = सरकारची निव्वळ कर्ज उभारणी + इतर देणी.
किंवा
= एकूण खर्च − (महसुली जमा + कर्जपुनर्प्राप्ती + इतर मिळकत)
किंवा
= एकूण खर्च − (महसुली जमा + कर्जेतर भांडवली जमा)

- ~~*~~ जास्तीच्या खर्च भागविण्यासाठी सरकारने एका वर्षात घेतलेली एकूण कर्जे = राजकोषीय तूट.

④ प्राथमिक तूट = राजकोषीय तूट − घेतलेल्या कर्जावरील व्याज खर्च.

⑤ प्रभावी महसुली तूट = महसुली तूट − भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठीची अनुदाने
भांडवली मालमत्तेची मालकी केंद्र/राज्य/स्थानिक सरकारांचीच असल्याने अनुदाने महसुली बाजूला मांडली जातात.

## तुटीचा अर्थभरणा / तुटीचे अर्थप्रबंधन :

मुद्दाम निर्माण केलेली तूट ज्या मार्गांनी भरून काढली जाते त्याला तुटीचा अर्थभरणा म्हणतात.

~~[illegible]~~ स्त्रोत : 1) RBI कडून घेतलेली कर्जे
2) नवीन चलन निर्मिती
3) स्वतःच्या संचीत रोख पैशातून

सुष्परिणाम : ① सरकारी खर्चात प्रचंड वाढ
② चलनवाढ / भाववाढ - वस्तू / सेवांची मागणी व त्यामुळे किंमती वाढतात.
③ सक्तीची बचत : निश्चित उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या बाबतीत.
④ बँकांची पतनिर्मिती वाढते - बचतीमुळे
⑤ खाजगी गुंतवणूकीच्या संरचनेत बदल.

भारता... 2000-0... ) मूल्याधारि...

* राजकोषिय दायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा : ( FRBM-ACT-2003 - Fiscal Responsibility & Budget Management Act. )

→ राजकोषीय तूट व महसुली तूट कमी करण्यासाठी सरकारवर कायद्याने बंधन आणण्यासाठी FRBM-कायदा २००३ संमत.
अंमलबजावणी - ५ जुलै २००४
त्यानुसार पुढील बंधने : मार्च २००९ पर्यंत महसुली तूट शून्यावर आणणे.
मार्च २००९ पर्यंत राजकोषीय तूट ३ टक्क्यावर आणणे
वरील बाबी संदर्भात वार्षिक लक्ष्ये ठरविण्यासाठी — विजय केळकर समिती -
ऑगस्ट २००४ - त्यानुसार कायदा लागू.
वार्षिक लक्ष्ये ⟶ २००४-०५ पासून दरवर्षी महसुली तूट GDP च्या ०.५% कमी करणे
— " — राजकोषियतूट " — ०.३% कमी करणे
२०१६ मध्ये FRBM कायद्याचे व्यापक परीक्षण करण्यासाठी NK singh समिती.

अर्थसंकल्पाची प्रमुख रूपे

① पारंपारिक अर्थसंकल्प : उद्देश - संसदेचे कार्यकारी मंडळावर नियंत्रणप्रस्थापित करणे.
यामध्ये आय व खर्चाचे विवरण
परंतु लाभाचे विवेचन नसते.

② निष्पादन अर्थसंकल्प : - सरकारी खर्चाचे विभाजन - सरकारी कार्ये, कार्यक्रम व कामकाज यामध्ये करून प्रदर्शित केलेला अर्थसंकल्प.
→ वित्तीय संसाधनाची कार्यक्रम विभागणी.
→ प्रदानावर आधारित ⟹ यासाठी भौतिक आदानांची निर्मिती.
भारतात याबाबत पहिला अभ्यास १९५२ — डिन ॲपलबी.
१९७३-७४ - प्रशासकीय सुधारणा आयोग भारत सरकार — सर्व विभाग, व राज्य सरकारांसाठी - मार्गदर्शक तत्वे.

③ परिणाम अर्थसंकल्प : गुणवत्ता परीक्षणाचे माध्यम.
सरकारी कार्यक्रमाच्या विकासात्मक परिणामांचे मोजमाप करणे.
साध्य करावयाच्या फलनिष्पत्तीचा भाग.

Scanned by CamScanner

⇒ भारतात परिणाम अर्थसंकल्प: प्रथम पी. चिदंबरम - २५ ऑ. २००५ (२००५-०६ साठी)
⇒ २००७-०८ पासून निष्पादन व परिणाम एकत्र करून परिणाम अर्थसंकल्प मांडावयास सुरुवात.

## ) शून्याधारित अर्थसंकल्प

सरकारी खर्चाची उत्पादकता वाढविणे व
अनुत्पादक सरकारी खर्च कमी करणे } मुख्य उद्देश.

→ या संकल्पनेचे आद्य प्रवर्तक ⇒ पीटर ए पीहर:
यामध्ये प्रत्येक खात्याला आपले खर्चाचे अंदाज ठरविताना मागील वर्षाचे खर्चाचे आकडे आधारभूत न मानता खात्याचा मुळापासून खर्चाचा अंदाज घेतला जातो म्हणजेच आधार शून्य मानला जातो.

आतापर्यंतचे प्रयोग → अमेरिका पीटर - १९६३-६४ - जॉर्जिया राज्यात.
⇒ १९७७-७८ पासून भारतात खाजगी क्षेत्रात - क्रियानिया इंडस्ट्रीज व युनियन कार्बाईड
⇒ १९८३ - सरकारी स्तरावर - विज्ञान व तंत्रज्ञान विभागासाठी.
⇒ १९८६ — आठव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ही तत्वे स्विकारली.
त्यानुसार सर्व मंत्रालये/राज्य सरकारे/सार्व. उपक्रम - १९८७-८८ पासून १ कोटीपेक्षा अधिक खर्चाच्या योजनांसाठी.
⇒ राज्य स्तरावर - १९८६ मध्ये महाराष्ट्राने ४२ विभागांसाठी - प्रथम
मुख्यमंत्री - शंकरराव चव्हाण वित्त मंत्री - सुशीलकुमार शिंदे नंतर कर्नाटक व आंध्र प्रदेश.

## ⑤ जेंडर बजेट

जेव्हा महिलांसाठी स्वतंत्र तरतुदी केल्या जातात तेव्हा त्यास जेंडर बजेट म्हणतात.
परंतु याचा अर्थ महिलांसाठी स्वतंत्र बजेट नव्हे.
ही संकल्पना सर्वप्रथम - ऑस्ट्रेलिया मध्ये
⇒ भारतात सुरुवात — ९व्या योजनेपासून — महिला घटक योजना.
यानुसार बजेटमध्ये संबंधित मंत्रालयाने किमान ३०% निधी महिलांसाठी निश्चित करावा.
⇒ २०००-०१ च्या अर्थसंकल्पीय भाषणात पहिल्यांदा जेंडर बजेटचा उल्लेख.
⇒ सध्या ५६ मंत्रालयांनी जेंडर बजेटिंग सेल स्थापन केले आहेत.

## * सार्वजनिक खर्च - वाढ आणि कारणे *

⇒ सार्व. खर्च = पुढील आर्थिक वर्षात करावयाच्या खर्चाचे विवरण.

विभाजन ⇒ महसुली खर्च व भांडवली खर्च ⇒ योजना खर्च व बिगरयोजना खर्च.
i) अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खर्च
ii) भौतिक मालमत्तेच्या उत्पादनासाठी
iii) सामाजिक सेवांची तरतूद करण्यासाठी

Scanned by CamScanner

# *. सार्वजनिक कर्ज *

→ सार्वजनिक कर्ज – सरकारच्या करेतर महसुलातील महत्त्वाचा स्रोत.
सार्वजनिक कर्जात: अंतर्गत व बाह्य कर्ज यांचा समावेश.
सार्वजनिक कर्जात इतर देणी मिळविल्यास त्यास सरकारी कर्ज म्हणतात.
सार्वजनिक कर्ज ⟶ संचित निधीचा
देणी ⟹ सार्वजनिक लेखे चा भाग.

1) अंतर्गत कर्जे: देशांतर्गत अर्थव्यवस्थेतून घेतलेली.
i) बाजार कर्जे ⟹ जनता व बँकांकडून
ii) अल्पकालीन ⟶ RBI / व्यापारी बँक / राज्य सरकारे यांना विकलेल्या हुंड्या
iii) दीर्घकालीन ⟹ RBI / व्यापारी बँका इ. ना विकलेले दीर्घकालीन रोखे.

2) बाह्य कर्जे ⇒ परकीय सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून

3) देणी ⇒ सरकारच्या व्याजधारित देयतांचा समावेश उदा. पोस्टातील लघु बचती, जनरल सेविंग सर्टिफिकेट्स, प्रॉव्हिडंट फंड इ.

## लेखा व लेखापरिक्षण (Accounting and Auditing)

लेखा म्हणजे ⟶ जमा व खर्च
लेखा परिक्षण ⟶ जमा खर्चाची तपासणी.
या यंत्रणेत. ① भारताचा नियंत्रण व महालेखापरिक्षक (CAG)
② कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंट्स (CGA)
③ अर्थविषयक संसदीय समित्या

## * भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षक (Comptroller and Auditor General of India – CAG)

नेमणूक ⇒ कलम 148 – राष्ट्रपतींकडून.
कार्यकाल ⇒ 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत.
पात्रता ⇒ लेखे / लेखापरिक्षण तसेच आर्थिक व्यवहार याबाबतचे उत्तम ज्ञान
बडतर्फी ⇒ संसदेच्या दोन्ही सभागृहात बडतर्फीचा ठराव एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व हजर व मतदानात भाग घेणाऱ्या सदस्य संख्येच्या 2/3 बहुमताने संमत झाल्यास

कार्ये ⇒ 1976 पूर्वी ⇒ ① लेखेविषयक ② लेखे तपासणी विषयक
तदनंतर. i) भारताच्या / राज्य सरकारच्या / विधान सभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांच्या खर्चाची तपासणी अहवाल तयार करणे.
केंद्र सरकारचा अहवाल ⟶ राष्ट्रपतींना सादर करतात – राष्ट्रपती संसदेत मांडण्याचे घडवून आणतात ⇒ संसद तो अहवाल लोकलेखा समितीकडे पाठविते ⇒ समिती त्याचा अभ्यास करून दुय्यम अहवाल तयार करतात व संसदेत मांडतात.
राज्य सरकारचा अहवाल ⟶ राज्यपालांना सादर करतात ⇒ विधानसभेत.

Scanned by CamScanner

भारताच्या / राज्यांच्या सार्वजनिक लेखे व अकास्मिक निधीतून झालेल्या खर्चाची तपासणी करणे.

केंद्र व राज्यांच्या खात्यांनी केलेला व्यापार, उत्पादन, जमा खर्च इ. तपासणी करणे.

पुढील संस्थांच्या जमा खर्चाची तपासणी:

1) केंद्र व राज्य सरकारांचे सार्व. उद्योग.

2) केंद्र व राज्यांकडून वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था.

3) इतर महामंडळे किंवा संस्था (त्यांच्या कायद्यात तसे म्हटले असल्यास)

v) राष्ट्रपतीने सांगितल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तपासणी.

vi) २००० पासून निर्गुंतवणुकीच्या व्यवहारांची तपासणी.

## कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंटस (CGA)

⇒ ऑक्टो १९७६ पासून CAG चे लेखेविषयक कार्य अर्थमंत्रालयातील CGA कडे.

⇒ केंद्र सरकारचे सर्वोच्च 'लेखा प्राधिकारी'

⇒ घटनेच्या कलम १५० अन्वये केंद्र व राज्य शासनाचे लेख्यांचे स्वरूप विहित करण्याची जबाबदारी राष्ट्रपतीवर

⇒ राष्ट्रपतीच्या या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी CGA कडे.

⇒ लेखेविषयक कामासंदर्भात सरकारचा प्रमुख सल्लागार

कार्ये:
① तांत्रिकदृष्ट्या योग्य अशी लेखा व्यवस्था प्रस्थापित करणे.
② प्रत्येक महिन्याला सरकारच्या खर्च, महसूल, तूट, कर्जे यांचे सामीक्षात्मक विश्लेषण
③ वार्षिक विनियोजन लेखे व केंद्रिय वित्त लेखे.

## संसदिय समित्या

① लोकअंदाज समिती:
⇒ पहिल्यांदा रचना १९२१
⇒ स्वातंत्र्यानंतर जॉन मथाई (वित्तमंत्री) यांच्या शिफारशीनुसार १९५० - निर्मिती
⇒ लोकसभेचे ३० सदस्य - अध्यक्ष - सत्ताधारी पक्षातील - नियुक्त - लोकसभा अध्यक्ष
⇒ कार्यकाल - १ वर्ष.
⇒ नियुक्ती - एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व - अप्रत्यक्ष.
⇒ कार्ये: 1) जमा खर्चाच्या अंदाजात काटकसर सुचविणे - काटकसर सुचविणारी समिती म्हणतात.
2) प्रशासनात कार्यक्षमता व काटकसर आणण्यासाठी पर्याय घोषण सुचविणे

② लोक लेखा समिती:
⇒ १९१९ च्या मॉटफोर्ड सुधारणा कायद्यांतर्गत १९२१ साली स्थापना
⇒ सदस्य २२ (लोकसभा १५ + राज्यसभा ७)
⇒ एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व - अप्रत्यक्ष

Scanned by CamScanner

⇒ लोकसभेच्या १५ सदस्यांपैकी एकाची अध्यक्ष निवड (लोकसभा अध्यक्षाकडून)

⇒ १९६७ पासून विरोधी पक्ष सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड.

१९६७ — मिनू मसानी.

⇒ कार्यकाल - १ वर्ष.

कार्य ⇒ 1) सरकारी तिजोरीतून काढल्या गेलेल्या पैशाचा जमा-खर्च लेखे तपासते.

संसदेने ज्या बाबीवर खर्च करण्याचा अधिकार सरकारला दिला आहे त्या बाबीवरच पैसे खर्च केले जात आहे की नाही याची खात्री ही समिती करते.

अधिक खर्च झाल्यास वाढीव खर्चाची यथायोग्यता ठरवते.

ii) वित्तिय बाबीतील अनावश्यक खर्च, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, इ. तपासणी.

मर्यादा ⇒ i) सरकारी धोरणांवर टिका टिप्पणी करता येत नाही.

ii) खर्च झाल्यानंतर तपासणी करते.

③ सार्वजनिक निगमसमिती.

⇒ निर्मिती सर्वप्रथम 1964 — कृष्ण मेनन समितीच्या शिफारशीनुसार

सदस्य 22 ⇒ लोकसभा १५ - राज्यसभा ७

अप्रत्यक्ष - एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व -

मंत्र्याची निवडणूक सदस्य म्हणून केली जाऊ शकत नाही-

लोकसभेच्या सदस्यांपैकी अध्यक्ष ⇒ लोकसभा अध्यक्षाद्वारे.

कार्यकाल - एक वर्ष.

कार्ये = 1) सार्वजनिक उद्योगांचे अहवाल व लेखे तपासणे

2) महालेखापालाने तपासलेल्या सार्व उद्योगांचे अहवाल तपासणे.

3) उत्पादन, अर्थव्यवस्थेला मदत, रोजगारनिर्मिती, ग्राहकांच्या हितांचे रक्षण इ. बाबतीत सार्व उद्योगांचे मूल्यमापन करणे.

Scanned by CamScanner